**'' प्रेस नोट ''** दिनांक १०/०८/२०२६

**अंधेरी पोलीस ठाणे गु.र.क्र. ७९/२०२२ कलम-३७७, ५०६(२),भादंवि ६,१० पोक्सो ॲक्ट अन्वये दाखल गुन्हयातील आरोपीतास मा.सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई यांनी २० वर्षे कारावासाची शिक्षा सुनावलेबाबत.**

११ वर्षाचे मुलास आरोपीत नामे आकाश संजय पानपाटील वय-२७ वर्षे याने बुट ठेवण्याच्या बहाण्याने घरात बोलवुन आरोपीताने त्याचेवर लैंगिक अत्याचार केले व सदरची घटना कुणाला सांगितली तर जीवे मारून टाकण्याची धमकी दिली. अशा आशयाची तक्रार फिर्यादी यांनी अंधेरी पोलीस ठाणे येथे समक्ष येवुन दिल्याने अंधेरी पो. ठाणेस गु.र.क्र. ७९/२०२२ कलम-३७७, ५०६(२), भादंवि ६,१० पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नमुद गुन्हयाचे तपासी अधिकारी तत्कालीन पोलीस निरीक्षक अजय कुलकर्णी यांनी गुन्हयाच्या तपासादरम्यान गुन्हयातील आरोपीताविरोधात भक्कम वस्तुनिष्ठ, भौतिक व जैविक पुरावे गोळा करून व साक्षीदारांचे जाब-जबाब नोंद करून आरोपीताविरोधात विहीत मुदतीत मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्याची सुनावणी मा.न्यायालयात चालु होती.

दि.०७/०८/२०२६ रोजी मा.सत्र न्यायाधीश कोर्ट क्रमांक १२, दिंडोशी,मुंबई यांनी गुन्हयातील अटक आरोपी नामे आकाश संजय पानपाटील २७ वर्ष यास कलम ३७७ भा.द.वि आणि कलम ६ पोक्सो अंतर्गत २० वर्ष सश्रम कारावास व १,०००/- रूपये द्रव्यदंड तसेच कलम ५०६(२) भादंवि अंतर्गत ०५ सश्रम कारावास व १,०००/- रूपये द्रव्यदंड तसेच कलम १० पोक्सो अंतर्गत ०५ वर्ष सश्रम कारावास व १,०००/- रूपये द्रव्यदंड अशी शिक्षा सुनावली आहे. नमुद खटल्याच्या सुनावणीत मा. सरकारी अभियोक्ता म्हणून श्रीमती उषा जाधव यांनी कामकाज पाहिले आहे.

**उपरोक्त गुन्हयात आरोपीतास २० वर्षे गंभीर शिक्षा सुनावल्याबद्दल अंधेरी पोलीस ठाणेचे तत्कालीन तपासी अधिकारी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) समन्स वॉरन्ट पथकातील अधिकारी व अंमलदार तसेच कोर्ट कारकुन यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी पार पाडलेली आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती सो., मा. पोलीस सह आयुक्त, का.व सु. बृहन्मुंबई डॉ. श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग डॉ. श्री. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई श्री. दत्ता नलावडे यांचे मार्गदर्शनाखाली तसेच सहायक पोलीस आयुक्त, अंधेरी विभाग, श्री. योगेश शिंदे यांच्या देखरेखीखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंधेरी पोलीस ठाणे श्री. उमेश मचिंदर, पोलीस निरीक्षक अतुल निकम, पो.ह साजिद काझी (कोर्ट कारकुन), मपोशि नसरीन शेख (कोर्ट कारकुन), पोह संजय चव्हाण, पोह सागर भोसले (पोनि गुन्हे मदतनीस), पोशि निलेश पाटील(पोनि गुन्हे मदतनीस) यांनी पार पाडली आहे.